नि. फौ. ख. क्र.१४२/२०२०
सरकार वि. आदेश उर्फ आदित्य
नि.क्र.३१

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांचा पुरावा.**
**मी शपथेवर कथन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | सौ. रेखा गणेश वाकोडे, |
| वय | – | ४६ वर्ष, व्यवसाय– मजुरी, |
| रा | – | जामठी बु., ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. |

**यांचा सरतपास, सहायक सरकारी अभियोक्ता श्री.जी. एम.गव्हाळे यांच्या मार्फत सुरु –**
(वेळ– १२.३५)

१. मी आरोपीला ओळखते. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. घटना दि.०६.०६.२०२० रोजी संध्याकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान माझ्या राहत्या घराच्या दारासमोर रस्त्यावर घडली. त्यावेळी मी घरात होती. त्यावेळी मला भांडणाचा आवाज आला. मी बाहेर येवून पाहले असते आदेश तायडे हा माझ्या मुलास काठीने मारहाण करीत होता. त्यावेळी मंगेश सावडे, शाम हिवराळे व गजानन गवई यांनी आरोपीस आवरले. त्यानंतर आरोपी घरी गेला व घरुन लोखंडी पाईप घेवून आला. त्यावेळी मंगेश सावळे हा त्यास आवरायला गेला असता आरोपीने त्यास जबडयावर पाईप मारला. त्यामुळे मंगेश सावळे खाली पडला. त्यानंतर त्यास अतुल तायडे व गजानन गवई यांनी त्यास उचलून सरकारी दवाखान्यात नेले व तेथून ॲम्बुलन्सने मुर्तिजापूर येथे नेले. आरोपीने ज्या लोखंडी पाईपने मारहाण केली तो पाईप मला दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला आर्टिकल अ दाखविण्यात आला. सदर पाईप तोच आहे. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री.पी. पी. पाटील यांच्या मार्फत सुरु–**

२. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत मारहाणीच्या घटनेनंतर माझ्या मुलाचा कोणताही दवाखाना केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी देखील त्याबाबत कोणतेही दस्त मला मागितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाचे व आरोपीचे भांडण झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा व मंगेश सावळे हे आरोपीच्या बहिणीच्या घरी घटनेच्या काही दिवसा पुर्वी दारु पिवून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की,माझा मुलगा व मंगेश सावळे हे आरोपीच्या बहिण व जावाईसोबत भांडण केले. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा व मंगेश सावळे यांनी आरोपीच्या बहिणीचा गळा दाबला होता.

**३.** हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा व मंगेश सावळे यांचे घटनेच्या अगोदर पासून आरोपीशी पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझे घर व माझ्या भावाच्या घरामध्ये सात आठ घराचे अंतर होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे घर माझ्या घराच्या १० ते १५ घराच्या अंतरावर आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याचे घर ४ ते ५ घराच्या अंतरावर आहे.

**४.** मी माझा जबाब नोंदवितांना 'घटना माझ्या राहत्या घराच्या दारासमोर रस्त्यावर घडली' ही बाब व 'त्यावेळेस मंगेश सावळे आरोपीस आवरायला गेला असता आरोपीने त्याच्या जबडयावर पाईप मारला' ही पोलीसांना सांगितली होती. परंतु सदरहू दोन्ही बाबी माझ्या जबाबात नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

**५.** घटनेच्या दिवशी पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. असे काही घडले नाही की, पोलीसांनी घटनेच्या काही दिवसांनी माझा जबाब नोंदविला होता. हे मला माहिती नाही की, जर जबाब घटनेच्या काही दिवसांनी नोंदविला असेल तर तो चुकीचा असेल. सदर घटनेची फिर्याद माझ्या भावाने दुसऱ्या दिवशी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेची फिर्याद बरेच दिवसानंतर दिली नव्हती. हे मला माहिती नाही की, जर फिर्याद घटनेच्या आठ ते दहा दिवसांनी दिली असेल तर ती चुकीची असेल.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझा भाऊ मंगेश सावळे हा दारु पिवून होता. हे म्हणणे खरे नाही की, दारुच्या नशेत रोडवर पडल्यामुळे त्याच्या जबडयाला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणे घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा व भाऊ मंगेश सावळे याचे आरोपीसोबत पटत नाही म्हणून आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण (वेळ– ०१.१५),**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

ठिकाण:मुर्तिजापूर
दि. २५/११/२०२४.

आर. आर. पकडे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२) मुर्तिजापूर.